


रस्ते अपघातात २०२५ पर्यंत २० टक्के घट घडवण्याचे उद्दिष्ट

पान ३ वर

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

# दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com



'आयपीएल २०२५ चे नवीन वेळापत्रक जाहीर

पान ४ वर

वेर्णा, बुधवार, १४ मे २०२५ | पाने ४ | ₹ ४

| REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 251 | Verna, | facebook.com/dainikherald | Wednesday 14 May 2025 | Pages 4 | ₹ 4

# शिरगावच्या दुर्घटनेला सर्व यंत्रणा जबाबदार!

## लईराई यात्रा दुर्घटनेने सरकार भानावर | मुख्यमंत्री ; सत्य शोधन समितीचा अहवाल सार्वजनिक

■ टीम दैनिक हेराल्ड :

**डिचोली, दि. १३ : शिरगावच्या लईराई देवीच्या यात्रेदरम्यान झालेल्या चेंगराचेंगरीच्या दुर्घटनेचा संदीप जॅकीस समितीचा चौकशी अहवाल सरकारला प्राप्त झाला असून या दुर्घटनेला मंदिर समितिसह , जिल्हा प्रशासन , पोलिस यंत्रणा , स्थानिक पंचायत आणि जमावाला जबाबदार धरण्यात आले आहे. अशा प्रकारची दुर्घटना पून्हा घडू नये म्हणून चौकशी समितिने सरकारला काही महत्वाच्या शिफारसी केल्या आहेत, ज्याची अंमलबजावणी तातडीने होणे अपेक्षित आहे. धार्मिक उत्सवात ६ बळी घेणाऱ्या या दुर्घटनेत जवळपास १०० लोक जखमी झाले होते. त्यापैकी ३ जणांवर अजूनही गोमॅकोत उपचार सुरू आहेत , त्यातल्या दोघांची प्रकृती धोक्याबाहेर असून अन्य एकाच्या प्रकृतीतही सुधारणा होत आहे . दरम्यान पोलीसांकडून या दुर्घटनेचा स्वतंत्र तपास सुरूच राहील, असे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी मंगळवारी स्पष्ट केले .**

लाखों भक्तगणांचे श्रद्धास्थान आणि धोंडांची जत्रा या नावाने प्रसिद्ध असलेल्या शिरगावच्या प्रसिद्ध लईराई यात्रेत ३ मेच्या पहाटे अचानक चेंगराचेंगरी झाली. या चेंगराचेंगरीत ६ जणांचे बळी गेले तर जवळपास शंभरेक लोक जखमी झाले. गोव्याच्या इतिहासात पहिल्यांदाच घडलेल्या अशा प्रकारच्या दुर्घटनेने सरकार उघडे पडले. परिणामी या दुर्घटनेची चौकशी करण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी तातडीने उच्च स्तरीय बैठक घेऊन सत्यशोधन समिति नेमली. या समितीचा अहवाल सरकारला प्राप्त झाला असून मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी मंगळवारी तो माध्यमांसमोर जाहीर केला.

अहवालात नमूद केलेल्या मुद्द्यांवर बोलताना मुख्यमंत्री म्हणाले की, या जत्रेत शेकडो धोंड सहभागी होतात. यातल्या काही धोंडगणांनी शिस्त मोडली. तसेच दरवर्षी इतक्या मोठ्या प्रमाणात भक्तांची उपस्थिती असलेल्या या जत्रेचा अनुभव लक्षात घेता मंदिर समितीने कोणत्याही प्रकारचे योग्य नियोजन केले नाही. जत्रेच्या नियोजनाबाबत प्रशासनाकडून ज्या सूचना मंदिर समितीला देण्यात आल्या त्या सुचनांचे पालन मंदिर समितीने केले नाही. दुसरीकडे जिल्हा प्रशासनाने बीएनएस – २०२३ नुसार सुरक्षा उपायांची अंमलबजावणी होते की नाही याची खात्री करणे आवश्यक होते. परंतु यामध्ये जिल्हा प्रशासनाचा हलगर्जीपणा दिसून आला. त्याचबरोबर पोलिस यंत्रणेकडून पुरेशा प्रमाणात बंदोबस्त करण्यात आला नाही. इतकेच नाही तर गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी ड्रोन किंवा वॉच टॉवरची व्यवस्था करण्यात आली नाही. या सगळ्यासोबतच स्थानिक पंचायतीने कोणतेही निकष न लावता किंवा कोणत्याही सुरक्षा उपायांची खात्री न करता सरसकट सर्व दुकानांना विद्युत कनेक्शन घेण्यास नाहरकत दाखले दिले. या सगळ्या गोष्टी या दुर्घटनेला कमी अधिक प्रमणात जबाबदार आहेत, असे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी म्हटले आहे.



### जमाव व्यवस्थापन आराखडा सक्तीचा करणार

**लईराई देवीच्या जत्रेदरम्यान झालेल्या चेंगराचेंगरीने सरकारचे डोळे उघडले असून यापूढे अशी कोणतीही घटना घडू नये म्हणून सर्व प्रकारची खबरदारी घेण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी स्पष्ट केले. गोव्यात जेव्हढे काही सर्व धर्मियांचे वार्षिक उत्सव असोत वा कोणतेही इव्हेंट असोत. या सगळ्या उत्सवाच्या परवानगीकरीता यापुढे आयोजकांना गर्दी व्यवस्थापन आराखडा (क्राउड मॅनेजमेंट प्लान) सादर करणे सक्तीचे राहणार आहे. पुढच्या वर्षीच्या लईराई जत्रेत पवित्र तळीपासून होमखंड पर्यंतचा धोंडांचा मार्ग हा फक्त धोंडांसाठीच राहणार आहे. तसेच सध्या ज्या रस्त्यावर चेंगराचेंगरी झाली तो रस्ता सरकार स्वत:च्या खर्चाने पुढच्या जत्रेपूर्वी संपूर्णपणे पुरेसा रुंद करणार असल्याचे आश्वासन मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी दिले आहे. मृतांच्या कुटुंबीयांना जाहीर झालेली १० लाखांची मदत आणि जखमींना जाहीर झालेले १ लाख लवकरच दिले जाणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले आहे**

# खुद्द मुख्यमंत्र्यांच्या कार्यालयात चोरी ?

■ टीम दैनिक हेराल्ड

### कायदा आणि सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह

**पणजी, दि. १३ :** राज्याच्या प्रशासन आणि राजकारणात खळबळ उडवणाऱ्या घटनेत मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांच्या स्थानिक मतदारसंघातील अधिकृत कार्यालयात चोरी झाली असल्याची सुत्रांची माहिती आहे. ही धक्कादायक घटना केवळ कायदा–सुव्यवस्थेच्या स्थितीबाबत गंभीर प्रश्न निर्माण करणारी नसून, मुख्यमंत्री स्वतः राज्याचे गृहमंत्री असतानाही त्यांच्याच कार्यालयात सुरक्षा भेद झाला, हे विशेष लक्षवेधी ठरत आहे.

साखळी येथील या कार्यालयातून मोबाईल फोन्स, रोख रक्कम आणि इतर काही वस्तू चोरीला गेल्याची तक्रार एका कर्मचाऱ्याने डिचोली पोलिस ठाण्यात दाखल केली. पोलिसांनी प्राथमिक माहिती अहवाल दाखल केला असून, याप्रकरणी अधिक तपास सुरू असल्याची माहिती आहे.

पोलिस विभागातील वरिष्ठ सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, ही बाब गंभीर असून सखोल चौकशी सुरू आहे. तपासाच्या संदर्भात दोन ते तीन जणांना ताब्यात घेण्यात आले आहे, अशी माहिती दिली, मात्र अधिकृतरित्या कोणतीही पुष्टी करण्यात आलेली नाही.

विशेष म्हणजे, डिचोली पोलिस विभागातील वरिष्ठ अधिकारी या घटनेबाबत कोणतेही अधिकृत वक्तव्य देण्यास टाळाटाळ करत आहेत. यामुळे तपासातील पारदर्शकतेबाबत आणि या प्रकरणाच्या गांभीर्याबाबत शंका निर्माण होत आहेत.

मुख्यमंत्र्यांचे कार्यालय हे केवळ राजकीय दृष्टिकोनातून नव्हे, तर सुरक्षेच्या दृष्टीनेही अत्यंत महत्त्वाचे केंद्र मानले जाते. अशा कार्यालयात चोरी होणे ही राज्यातील सुरक्षाव्यवस्थेतील त्रुटी अधोरेखित करणारी बाब मानली जात आहे. या प्रकारानंतर सार्वजनिक चर्चेला उधाण आले असून, जेव्हा राज्याच्या गृहमंत्र्यांच्या देखरेखीखालील कार्यालयात अशा घटना घडतात, तेव्हा सर्वसामान्यांच्या सुरक्षेची काय हमी? असा सवाल उपस्थित केला जात आहे.

सध्या पोलिसांकडून या चोरीप्रकरणाचा तपास सुरू असून, आरोपींची ओळख पटवण्याचे आणि त्यांना अटक करण्याचे प्रयत्न सुरु आहेत. मात्र, या तपासाची दिशा, गती आणि पारदर्शकता यावरच जनतेचे लक्ष केंद्रीत झाले आहे.

## निवडक

### मान्सून अंदमानमध्ये बेटांवर पोहोचला

**भोपाळ, दि. १३ :** हवामान खात्याच्या म्हणण्यानुसार, नैऋत्य मान्सून मंगळवारी निकोबार बेटे, दक्षिण बंगालचा उपसागर, दक्षिण अंदमान समुद्र आणि उत्तर अंदमान समुद्राच्या काही भागात पोहोचला. हवामान खात्याने १० मे रोजी सांगितले की नैऋत्य मान्सून २७ मे रोजी केरळ किनाऱ्यावर धडकेल. साधारणपणे तो १ जून रोजी केरळमध्ये पोहोचतो.

हवामान खात्याने आज हरियाणा आणि छत्तीसगडसह २३ राज्यांमध्ये वादळासह पावसाचा इशारा जारी केला आहे. आसाम आणि अरुणाचलसह ८ राज्यांमधील अनेक जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसाची शक्यता आहे.

राजस्थानमधील २१ जिल्ह्यांमध्ये वादळ आणि पावसाचा इशारा देण्यात आला आहे. सोमवारी संध्याकाळी राज्यात अचानक हवामान बदलले. जयपूरसह अनेक जिल्ह्यांमध्ये मुसळधार पाऊस सुरू झाला. सिकर आणि अजमेरमध्येही गारपीट झाली.

मध्य प्रदेशातील ३८ जिल्ह्यांमध्ये वादळ आणि पावसाचा इशारा देण्यात आला आहे. तथापि, काही जिल्ह्यांमध्ये तीव्र उष्णता होती. खजुराहोमध्ये ४१.४ अंश सेल्सिअस तापमान नोंदवण्यात आले.

---

### परराष्ट्र मंत्रालयाने ट्रम्प यांचे २ दावे फेटाळले

**नवी दिल्ली, दि. १३ :** जम्मू–काश्मीर प्रश्नात तिसऱ्या पक्षाचा हस्तक्षेप स्वीकारार्ह नाही, असे भारताने मंगळवारी म्हटले आहे. भारत–पाकिस्तान हे प्रश्न आपापसात सोडवतील, असे परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जैस्वाल यांनी सांगितले. ते म्हणाले की, पाकिस्तानला पीओके रिकामा करावे लागेल. सर्व प्रकरणे द्विपक्षीय पद्धतीने सोडवली जातील.

खरं तर, भारताच्या या प्रतिक्रियेला जम्मू–काश्मीर वाद सोडवण्याच्या मुद्द्यावर अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या विधानाशी जोडले जात आहे. ट्रम्प यांनी ११ मे रोजी म्हटले होते की, 'हजार वर्षांनंतर' काश्मीर प्रश्नावर तोडगा निघू शकतो का हे पाहण्यासाठी मी दोघांसोबत एकत्र काम करण्याचा प्रयत्न करेन. १० मे रोजी ट्रम्प यांनी सोशल मीडियावर भारत आणि पाकिस्तानमधील युद्धबंदीची माहिती दिली होती.

जम्मू–काश्मीरच्या मुद्द्यात तिसऱ्या पक्षाचा हस्तक्षेप स्वीकारार्ह नाही. भारत आणि पाकिस्तान हे प्रश्न आपापसात सोडवतील. यामध्ये कोणताही बदल नाही. प्रलंबित खटला फक्त पीओकेच्या ताब्याबद्दल आहे. यावर आपण चर्चा करणार आहोत.

---

### भारत अमेरिकेवर प्रत्युत्तरात्मक कर लादणार

**नवी दिल्ली, दि. १३ :** अमेरिकेने स्टील आणि ल्युमिनियमवरील कर लादल्यानंतर, भारताने म्हटले आहे की जागतिक व्यापार संघटनेच्या नियमांनुसार प्रत्युत्तरात्मक शुल्क लादले जाईल. आपल्या व्यावसायिक सुरक्षेचा हवाला देत, अमेरिका २०१८ पासून या उत्पादनांवर शुल्क लादत आहे. डब्ल्यूटीओ नुसार, याचा परिणाम ७.६ अब्ज (सुमारे रु. ६४,५१२ कोटी) भारतीय उत्पादनांच्या आयातीवर होईल, ज्यापैकी सुमारे १.९१ अब्ज (सुमारे रु. १६,२१३ कोटी) आयात शुल्काच्या अधीन आहे. अमेरिकेने नवीन शुल्क लादण्याच्या निर्णयानंतर एप्रिलमध्ये भारताने डब्ल्यूटीओ च्या सेफगार्ड करारांतर्गत अमेरिकेशी वाटाघाटी करण्याबाबत बोलले होते. सल्लामसलत करण्याची विनंती करण्यात आली.

प्रत्युत्तरादाखल, अमेरिकेने डब्ल्यूटीओ ला सांगितले की हे शुल्क राष्ट्रीय सुरक्षेच्या कारणास्तव लादण्यात आले आहे आणि त्यांना सुरक्षिततेचे उपाय म्हणून मानले जाऊ नये. २३ मार्च २०१८ रोजी अमेरिकेने काही स्टील आणि ल्युमिनियम उत्पादनांवर सुरक्षा उपाय लागू केले. याअंतर्गत, त्यांनी या उत्पादनांवर २५७ शुल्क आणि १०७ जाहिरात मूल्य कर लादला होता.

# ताळगाव परिसरात पाणीटंचाई कायम ; रहिवासी टँकरवर अवलंबून

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १३ :** ताळगाव येथील व्होडले भाट आणि बोरभाट परिसरातील रहिवाशांना गेल्या १३ दिवसांपासून सुरू असलेल्या पाणीटंचाईचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने दूषित पाणीपुरवठ्याच्या तक्रारीनंतर पुरवठा बंद केल्यामुळे या भागातील नागरिक अजूनही पाण्यासाठी धावपळ करत आहेत.

दूषित पाण्याच्या तक्रारीनंतर सार्वजनिक बांधकाम विभागाने परिसरातील पाईपलाइन तपासून जुन्या पाईपलाइनच्या जागी नवीन पाईपलाइन बसवण्याचे काम सुरू केले. मात्र, या कामानंतरही अनेक घरे अजूनही पाणीवंचित असून



नागरिकांना टँकरमधून पाणी खरेदी करण्यासाठी भरमसाठ खर्च करावा लागत आहे.

याबाबत माहिती देताना स्थानिक रहिवासी फेलिक्स अल्मेडा म्हणाले, गेल्या दहा दिवसांत मी तीन वेळा टँकरमधून पाणी खरेदी केले आहे. एका टँकरची किंमत सुमारे ८०० रुपये असून ते फक्त तीन ते चार दिवस पुरते. आधी दूषित पाणी मिळत होतं, आता पाणीच मिळेनासं झालं आहे.

दुसऱ्या एका रहिवाशाने सांगितले की, दूषित पाण्याच्या घटनेनंतर आम्हाला आता पाण्यावर विश्वास राहिलेला नाही. आम्ही आमचे पाण्याचे फिल्टर बदलले आहेत. आधी काही वेळापुरतं पाणी मिळत होते, पण सध्या पुरवठा पूर्णपणे बंद आहे. पीडब्ल्यूडीकडून पाठवले जाणारे टँकर देखील इथे पोहोचत नाहीत. आमदार किंवा इतर लोकप्रतिनिधीही या समस्येकडे दुर्लक्ष करत आहेत.

स्थानीय रहिवासी व्हिक्टर कार्डिन्हो यांनी सांगितले की, पाईपलाइनचे काम झाले असले तरी आम्हाला अद्याप कनेक्शन दिलेले नाही. जे काही ऐकले आहे त्यानुसार, अजून काही दिवस वाट पाहावी लागणार आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागातील एका वरिष्ठ अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, बोरभाट परिसराला शुक्रवार, १६ मे २०२५ पर्यंत नियमित पाणीपुरवठा सुरू होण्याची शक्यता आहे. रहिवाशांकडून दूषित पाण्याच्या तक्रारी आल्यानंतर १ मेपासून पाईपलाइन बदलण्याचे काम हाती घेण्यात आले. व्होडले भाटमधील काही घरांना १० मेपासून पाणीपुरवठा पूर्ववत करण्यात आला आहे. सध्या सुमारे ४५० वैयक्तिक जोडण्या प्रलंबित असून त्या पूर्ण केल्यानंतर संपूर्ण परिसराला पाणीपुरवठा सुरळीत होईल, अशी माहिती अधिकाऱ्याने दिली.

# सासष्टी तालुक्यात तीव्र पाणीटंचाई ; नागरिकांत तीव्र नाराजी

■ टीम दैनिक हेराल्ड

**सासष्टी, दि. १३ :** सासष्टी तालुक्यातील विविध भागांना मंगळवारी पुन्हा एकदा तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागला. किनारी आणि अंतर्गत भागात पाणीपुरवठा खंडित झाल्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला असून काही भागांमध्ये नागरिक रस्त्यावर उतरून निषेध करताना दिसले.

माजोर्डा येथील काही वॉर्डमध्ये ५ मेपासूनच पाणीपुरवठा बंद असून अद्यापही तो पूर्ववत झालेला नाही. संतप्त नागरिकांनी मंगळवारी अधिकाऱ्यांकडून उत्तर मागण्यासाठी रस्त्यावर जमून निषेध नोंदवला. याच प्रकारची परिस्थिती बेतालभाटी मध्येही पाहायला मिळाली. स्थानिक सरपंच नागरिकांसोबत रस्त्यावर उतरले होते.

फातोर्डा, राय आणि वेर्णा परिसरातही नळांना पाणी नसल्यामुळे रहिवाशांनी तीव्र त्रासाला सामोरे जावे लागले. कोणतीही पूर्वसूचना न देता पाणीपुरवठा खंडित केल्याने आणि तात्काळ उपाययोजना न झाल्याने स्थानिकांमध्ये नाराजीचे वातावरण होते.

**▶ माजोर्डा, बेतालभाटी, फातोर्डा, रायआणि वेर्णा परिसरात नळ कोरडे**

गेल्या काही दिवसांपासून सासष्टीच्या विविध भागात वारंवार पाणीपुरवठा खंडित होत असल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. कोलवा परिसरातील पाईपलाईनमध्ये गळती आढळून आल्यामुळे या भागातील पाणीपुरवठा आधीच विस्कळीत झाला होता. दरम्यान, कुडतरी मतदारसंघात टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करण्यात आला आहे.

पाणीपुरवठा खात्याच्या अधिकाऱ्यांनी माहिती दिली की वेर्णा येथील नवीन ' जिका' पाइपलाइनमध्ये, शेतमळ्यातून जाणाऱ्या भागात गळती झाल्याचे आढळून आले. गळतीचे ठिकाण अचूकपणे शोधणे कठीण असल्यामुळे काही भागातील पाइपलाइन बदलावी लागली. त्यामुळे पाणीपुरवठा तात्पुरता थांबविण्यात आला.

अधिकाऱ्यांनी आश्वासन दिले की मंगळवारी रात्री उशिरापर्यंत पाइपलाइनद्वारे पाणीपुरवठा पूर्ववत करण्यात येईल. दुरुस्तीच्या दरम्यान जुनी समांतर पाइपलाइन सुरू ठेवण्यात आली असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. पाणीटंचाईने त्रस्त नागरिक पुरवठा सुरळीत होण्याची प्रतिक्षा करत आहेत. प्रशासनाकडून अद्याप पुरेशा संवादाचा अभाव जाणवत असून जलसंपत्ती विभागाने अधिक प्रभावी नियोजन करणे आवश्यक असल्याची स्थानिकांची भावना आहे.

# अणुऊर्जा प्रकल्पाच्या प्रस्तावावर विरोधकांचा संताप

## गोवा भाजपची चाचणी प्रयोगशाळा नाही : काँग्रेसचा आरोप

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १३ :** राज्यात अणुऊर्जा प्रकल्प स्थापन करण्याच्या केंद्र सरकारच्या सूचनेवर विरोधी पक्षांनी तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली असून, गोव्याला भाजपच्या धोकादायक प्रयोगांची प्रयोगशाळा बनवण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप केला आहे.

गोवा प्रदेश काँग्रेस समितीचे अध्यक्ष अमित पाटकर यांनी केंद्रीय ऊर्जा मंत्री मनोहर लाल खट्टर यांच्या वक्तव्यावर कठोर टीका करताना सांगितले की, गोव्याचे टेकाड, जंगल, शेती आणि नद्यांचे आधीच मोठे नुकसान झाले आहे. आता अणुऊर्जा प्रकल्पासारख्या धोकेदायक योजनेमुळे राज्याच्या पर्यावरणाला आणखी धोका निर्माण होईल. गोव्याच्या भूमी, उपजीविका आणि पर्यावरणासाठी ही योजना पूर्णपणे अयोग्य असल्याचे सांगत पाटकर यांनी या प्रकल्पाला पूर्ण विरोध करण्याचा निर्धार व्यक्त केला.



आम आदमी पक्षानेही या प्रस्तावाला स्पष्ट शब्दांत नाकारले आहे. पक्षाचे प्रदेशाध्यक्ष ॲड. अमित पालेकर यांनी प्रश्न उपस्थित की, शेजारच्या कर्नाटकातील कैगा येथे अणुऊर्जा प्रकल्प अस्तित्वात असताना गोव्यात आणखी एका प्रकल्पाची गरजच काय आहे? त्यांनी केंद्र आणि राज्य सरकारवर आरोप केला की, ते गोव्यातील नैसर्गिक संसाधनांचा योजनाबद्ध रित्या ऱ्हास करत आहेत. 'आप' अशा कोणत्याही प्रकल्पाला दात आणि नखे लावून विरोध करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

गोवा फॉरवर्ड पक्षाचे अध्यक्ष आणि आमदार विजय सरदेसाई यांनी या संदर्भात सरकारवर विश्वासदर्शकतेचा मुद्दा उपस्थित केला. अणुऊर्जा प्रकल्प उभारण्यापूर्वी सरकारने निवडून आलेल्या प्रतिनिधींसोबत आणि जनतेसोबत सुसंवाद साधावा, अशी मागणी त्यांनी केली. गोवा हे पर्यटनावर आधारित राज्य असल्याने, अणुऊर्जा प्रकल्प ही उच्च–जोखीम यंत्रणा ठरू शकते. त्यामुळे ठोस आणि कार्यक्षम आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा आधी सिद्ध करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

सरदेसाई यांनी फुकुशिमा आणि चेरनोबिलसारख्या अणु दुर्घटनांचा संदर्भ देत राज्य सरकारच्या धोरणात्मक दृष्टीकोनावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. अणुऊर्जेचे फायदे असले तरी त्याचे संभाव्य दुष्परिणाम अधिक गंभीर आहेत. गोव्याच्या पर्यावरणीय समतोलावर आणि लोकांच्या आरोग्यावर त्याचा प्रतिकूल परिणाम होऊ शकतो, असे ते म्हणाले. त्यांनी हे ही नमूद केले की, यापूर्वी भाजपनेच भारत–अमेरिका अणुकराराला विरोध केला होता.

राजकीय विश्लेषक त्राजानो डी'मेलो यांनी प्रस्तावित अणुऊर्जा प्रकल्पाला विनाशकारी कल्पना संबोधत भाजपवर सडकून टीका केली. भाजपने गोव्याशी प्रयोग करण्याचे थांबवावे. हे राज्य अणुऊर्जा प्रयोगशाळा होण्यास अजिबात योग्य नाही. रेडिएशन किंवा गळती झाल्यास त्याचे गंभीर परिणाम गोव्याच्या लोकजीवनावर आणि जैवविविधतेवर होतील, असा इशारा त्यांनी दिला.

सर्व विरोधी पक्षांनी गोव्याच्या पर्यावरण–संवेदनशीलतेची जाणीव करून देत, अशा प्रकल्पामुळे निर्माण होणाऱ्या संभाव्य पर्यावरणीय आणि सुरक्षिततेच्या धोक्यांवर चिंता व्यक्त केली आहे. त्यांनी अशा कोणत्याही हालचालींचा तीव्र विरोध करण्याचा आणि आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.